**A Special Lecture and Open Discussion on "Media and Women"**

**Date: 16 Dec 2016**
**Time: 3:00 pm**
**Venue: Dept of Economics**

नॅक अ दर्जा प्राप्त

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

**द्वारा आयोजित**

## विशेष व्याख्यान व मुक्तसंवाद

**विषय:**

## चित्रपट माध्यम आणि स्त्री

**प्रमुख व्याख्याते :**

मा. मिलिंद शिंदे

सुप्रसिद्ध सिने व नाट्य अभिनेते



**विनीत :**

प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे

संचालक, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र.

---

शूक्रवार, दि. १६ डिसेंबर २०१६, वेळ: दु. ३.०० वाजता

स्थळ : अर्थशास्त्र विभागाचे सभागृह

दै. दिव्य मराठी 17/12/2016

दै. दिव्य मराठी - 17-12-16
औरंगाबाद, शनिवार, १७ डिसेंबर २०१६ | ७

# अहंपणातून नव्हे, मित्रांच्या कौतुकातून कलावंत घडतो

## विद्यापीठाच्या कार्यक्रमात अभिनेते मिलिंद शिंदे

प्रतिनिधी | औरंगाबाद

'मी स्वतःला आरशात बघायचो, तेव्हा कोणत्याही भूमिकेच्या लायकीचा स्वतःला समजत नसे. मी नावाचे काहीच नसते. मीपणा, अहंभावातून कलावंत घडत नसतो. चारचौघे कौतुक करणारे आपल्यातला कलावंत पाहत असतात. त्यातून आपण घडत असतो.असे मत प्रख्यात सिनेअभिनेते, मिलिंद शिंदे यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे शुक्रवारी (१६ डिसेंबर) आयोजित 'मुक्त संवाद' कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. प्रतिभा अहिरे होत्या. 'चित्रपट माध्यम आणि स्त्री' या विषयावर अवघ्या दहा मिनिटांचे त्यांनी व्याख्यान दिले. त्यानंतर त्यांचा 'मुक्त संवाद' झाला. ते म्हणाले, 'कांटोसे खिचके आँचल...' या गाण्यापासून स्त्रीने पारंपरिक मानसिकतेतून बाहेर पडण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर राजकुमार संतोषी यांच्या 'दामिनी' सिनेमाने तर स्त्री नायिकेला बंड करण्यास भाग पाडले. त्यानंतर आजच्या काळातील 'कहाणी' चित्रपटाने अन्यायाविरुद्ध संघर्ष पुकारला आहे. स्त्रिया माणूस म्हणून आपला चेहरा व अस्तित्व शोधत आहेत. आपल्याला चेहरा, रंगरूप नसताना मल्लिका प्रसाद या मैत्रिणींनी शिफारस केल्यामुळे गिरीश कर्नाडच्या नाटकात भूमिका साकारण्याची संधी मिळाली. त्यानंतर अमृता सुभाषमुळे 'ती फुलराणी'मध्ये काम करण्याची संधी मिळाली. या दोन्ही मैत्रिणींमुळेच आपण आज अभिनेते होऊ शकल्यामुळे आपण ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या मंचावरून त्यांचे आभार मानत असल्याचे ते म्हणाले. या वेळी उद्योजक भाऊसाहेब थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. विकासकाका शिंदे, अॅड. रमेशभाई खंडागळे, भानुदास नरवडे, बुद्धप्रिय कबीर, कवी प्रा. ना. तु. पोघे, देवानंद पवार, जी. के. मगरे, डॉ. मिलिंद बनकर, प्रा. विष्णू सुरासे आदींची या वेळी उपस्थिती होती. प्रा. निर्मला जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी डॉ. सविता बहिरट, संतोष लोखंडे, विकास टाचले, संजय पोळ आदींनी प्रयत्न केला.

### अॅव्हरेज आयुष्य जगू नका...!

कोणत्या प्रकारचा सिनेमा दिग्दर्शित करायला आवडेल..? या प्रश्नाच्या उत्तरात शिंदे म्हणाले, 'मला सामाजिक आशयाचा सिनेमा दिग्दर्शित करायला आवडेल. कारण कॉमेडी सिनेमा काढून आपण केलेल्या सिनेमाने चर्चा घडवून आणली नाही तर काय उपयोग..? अशा जगण्याला मी 'बॉर्न अॅव्हरेज अँड डाय अॅव्हरेज' असे संबोधतो. नावीन्यपूर्ण करण्याची जिद्द ठेवा अन्यथा अशा जगण्याला अर्थ उरत नाही.

दै. लोकमत 17/12/2016



It's CASHLESS
Buy Properties

EVENT MANAGEMENT
Seminar on basis of event Management
Date: 18/12/2016 Sunday
Register Today.
Limited Seats
Call: 9823025557, 9850005584

दै. लोकमत 17/12/2016




विद्यापीठातील ताराबाई शिंदे अभ्यास केंद्रात आयोजित कार्यक्रमात बोलताना अभिनेते मिलिंद शिंदे.

दै. लोकमत - दि. 17-12-16

# 'समाजमनाच्या मशागतीची गरज'

## विद्यापीठ : ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रात मुक्तसंवाद

औरंगाबाद : समाजमनाची मशागत करण्यासह सामाजिक, सांस्कृतिक आरोग्य राखण्याची जबाबदारी कलावंतांची आहे. कलावंत हा कधीच परिपूर्ण होऊ शकत नाही. ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याचे प्रतिपादन अभिनेते मिलिंद शिंदे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर [मरा]ठवाडा विद्यापीठाच्या ताराबाई [शिं]दे स्त्री अभ्यास केंद्रात शुक्रवारी [मुक्त]संवाद कार्यक्रमाचे आयोजन [कर]ण्यात आले होते. 'चित्रपट आणि [स्त्री]' विषयावर मिलिंद शिंदे यांचे व्याख्यान झाले. यावेळी त्यांनी 'काँटोसे खिचके आँचल' या गाण्यापासून स्त्रीने पारंपरिक मानसिकतेतून बाहेर पडण्यास सुरुवात केली.

दामिनी चित्रपटात तिने कुटुंबात होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध संघर्ष पुकारला असल्याचे सांगितले. स्त्री माणूस म्हणून आज आपला चेहरा आणि अस्तित्व शोधत असल्याचेही शिंदे यांनी सांगितले. यावेळी मिलिंद शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मनमोकळेपणाने उत्तरे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राच्या संचालक प्रा. प्रतिभा अहिरे यांनी केले. कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब थोरात, भाई विकास शिंदे, अॅड. रमेश खंडागळे, प्रा. अशोक बंडगर, भानुदास नरवडे, अविनाश सावंत, बुद्धप्रिय कबीर, प्रा. ना. तु. पोघे, प्रा. विष्णू सुरासे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. निर्मला जाधव तर आभार प्रा. अश्विनी मोरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. सविता बहिरट, संतोष लोखंडे, विकास टापले, संजय पोळ आदींनी कार्य केले.

Lecture : Film Media & Women




